*Nashik District Maratha Vidya Prasarak Samaj's*

# KSKW Arts, Science & Commerce College, Cidco, Nashik.

## Department of History

# Certificate

*This is to certify that Mr. /Miss* Kasar Tejas Padamakar.

*Is a student of T.Y.B.A has successfully completed project work on at*

नाशिकमधील बौद्ध लेणीचा इतिहास.

*Under my guidance & direction. This work carried out during the academic year 2021-2022 toward partial fulfillment of bachelor in Art Degree course of SP Pune University.*

*Throughout the project he/she is found sincere, regular and hard working.*

*Teacher Guide*
**Prof. S. K. Aware**

**Head**
**Dept. of History**
KSKW, ACS College, CIDCO, Nashik

**Place: Cidco, Nashik**

**Date:** 17/05/2022

# अनुक्रमणिका


1. विषयाची प्रस्तावना

2. विषयाची उद्दिष्ट्ये

3. विषयाचे महत्व

4. संपूर्ण विषयाची संशोधनाची माहिती

5. निष्कर्ष

6. समारोप व आभार

7. प्रत्यक्ष भेटचे छायाचित्र

8. संदर्भ

# विषयाची उद्दिष्ट्ये

मानवी जीवनाच्या अनुषंगाने भौगोलिक ऐतिहासिक व सांस्कृतिक पर्यावणाला महत्व आहे. पर्यावरणातील वारसा स्थळ हि ऐतिहासिक सांस्कृतिक पर्यटन व रोजगार या दृष्टीने महत्वाची आहे व या वारसा स्थळाची माहिती लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी हा प्रकल्प करत आहोत. पांडवलेणी हि पर्यटन स्थळ म्हणूनच आपण बघत आलेलो आहोत. परंतु, त्या पर्यटन स्थळास वारसा स्थळ असेही म्हटले जाते. हे अजून कोणालाही माहित नाही. आपण स्थळास भेट देतो. तेथिल पर्यटनाचा आनंद घेतो. तेथील कोरीव काम शिल्प कला, चित्रकला, तेथील कोरलेल्या लेणी, मूर्ती, हे सर्व आपण तेथे बघतो. परंतु तेथील हे शिल्पकला चित्रकला कोरीव काम मूर्तिकला यांना इतिहासिक महत्व का प्राप्त झाले या स्थळास वारसा स्थळ म्हणून का म्हटले जाते हे प्रश्न अजून पर्यंत कोणालाही पडत नाही त्यामुळे पांडवलेणी हा विषय सर्वांना त्या विषयाचे त्या स्थळाचे ऐतिहासिक महत्त्व समजावे म्हणून हा प्रकल्प करत आहोत. पांडवलेणी येथील अनेक लेण्यांचे कोरीवकाम प्रत्येक लेणी क्रमांक हे प्रत्येक वेगळा इतिहास जोडलेला आहे त्या इतिहासाचे महत्व ते कोरीवकाम कोणत्या शतकात झाले हे सर्व तेथे येणाऱ्या पर्यटकांना समजावे व एक पर्यटन स्थळ म्हणूनच नावे तर त्यास एक वारसा स्थळ या स्थळास पारंपारिक सांस्कृतिक व धार्मिक असे इतिहास का लाभला आहे हे प्रश्न सुटावे व याची सर्वांना माहिती व्हावी म्हणून आपल्याला सर्वांना पांडवलेणी ही या शतकात त्या पांडवलेणी स्थळाचा काय इतिहास आहे हे समजावे म्हणून हाप्रकल्प करत आहोत पांडवलेण्याच्या प्रत्येक लेणी चा इतिहास हा वेगळ्या पद्धतीने रचलेला आहे तेथील नक्षीकाम चित्रकला कोरीव काम मूर्तिकला व बौद्ध धर्माचे धार्मिक इतिहास कशा पद्धतीने तेथे या आहे नैसर्गिक रित्या एक कशा पद्धतीने तेथे आहे याची माहिती या प्रकल्पातून देत आहे.

# विषयाचे महत्व

आत्तापर्यंत नाशिक भेटीमध्ये अनेक वेळा नाशिक-मुंबई महामार्गाला लागून मोठ्या टेकडीवर असलेले भांडवल यांना अनेक वेळा भेट दिली आहे वरून नाशिकचे विहंगम दृश्य दिसते तर त्या स्थळाची माहिती जर आपण घेतली तर आपण त्या वेगळ्या दृष्टीने त्या ठिकाणाकडे बघत असतो यासाठी नाशिक येथील पांडवलेणी अवस्था महत्व भारतात खडकात कोरलेल्या सुमारे बाराशे लेणी आहेत येथील हजारो लेणी महाराष्ट्रात आढळतात व डोंगरांमध्ये सर्वाधिक असल्याने येथे जास्त लेणी खोदण्याचे दिसते नाशिकच्या पांडवलेणी ही प्रसिद्ध आहे नाशिक पासून सहा किलोमीटर अंतरावर एका मोठ्या टेकडीवर या लेण्या आहेत या सर्वसाधारण पहिले मानला जातो.

ऐतिहासिक स्थळाचे या स्थळाचे महत्व तेथील कला शिल्पकला मूर्तिकला व कोरीव काम हे बघण्यासारखे आहे व त्या मागील इतिहास हे जाणून घेण्यासारखा आहे.

# संपूर्ण विषयाची संशोधनाची माहिती

## १. पांडवलेणीचा इतिहास -

त्रिरश्मी बौद्ध लेणी ही सुमारे इ.स. पूर्व २००च्या दरम्यान खोदलेली बौद्ध लेणी आहेत. भारत सरकारने या लेण्यांना महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून दिनांक ३ एप्रिल, इ.स. १९१६ रोजी घोषित केले हे.

सातवाहन राजांनी ही लेणी खोदण्यासाठी वेळोवेळी दान दिले असा उल्लेख येथील शिलालेखांत आढळून येतो.

➤ त्रिरश्मी बौद्ध लेणी -

सातवाहन आणि क्षत्रप या राजवंशाने त्रिरश्मी लेणी कोरण्यास मदत केली होती. येथील शिलालेख हे त्रिरश्मी लेण्यांचा इतिहास सांगणारा मोलाचा स्रोत आहे. नाशिक या भूभागावर सातवाहन राजांचे अधिराज्य असल्याचे पुरावे पाहायला मिळतात. नाशिकचा उल्लेख शिलालेखांतून वाचायला मिळतो.

सातवाहन घराण्यातील तिसरा राजा कृष्ण सातवाहन (सिमुक सातवाहनाचा भाऊ) याचा हा नासिकचा उल्लेख असणारा सर्वात जुना ज्ञात शिलालेख. हा आहे पांडवलेणीतील १४ व्या क्रमांकाच्या लेणीत. जवळजवळ २२०० वर्ष जुना, नासिकचे प्राचीनत्व सिद्ध पश्चिम भारतातील एक महत्त्वाचा हीनयान (थेरवाद) व महायान लेणी-समूह. या लेणी नाशिक शहरापासून पश्चिमेला सुमारे ८ किमी. अंतरावर मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गालगत आहेत. येथे तीन टेकड्या असून त्यांपैकी त्रिकोणी आकाराच्या 'त्रिरश्मी' टेकडीवर


लेणी खोदल्या आहेत. लेणींतील शिलालेखांमध्येही 'त्रिरश्मी' या नावाची प्राकृत रूपे 'तेकिरसी' व 'तिरन्हु' अशी आली आहेत. स्थानिक लोक या लेणींना 'पांडव (पांडू) लेणी' या नावाने ओळखतात.

पांडव लेणींचा अभ्यास जे. विल्सन (१८४७-४८), जे. स्टीव्हन्सन (१८५३), एडवर्ड वेस्ट व ऑर्थर वेस्ट (१८६७-६८), फर्ग्युसन व बर्जेस (१८८०), भगवानलाल इंद्रजी (१८८३), वॉल्टर स्पिंक (१९५४), ट्राबोल्ड (१९७०), दहेजिया (१९७२), ढवळीकर (१९७४, १९८४ व १९८६), वीनर (१९७७), जाधव (१९८०), एस. नागराजू (१९८०-८१), अलोने (१९८८), अ. जामखेडकर (२००२), मंजिरी भालेराव (२००९) इ. संशोधकांनी केला आहे.

पांडव लेणी प्रामुख्याने बौद्ध धर्माच्या हीनयान व महायान पंथांच्या कालखंडात खोदण्यात आली. येथे एकूण २७ ब्राह्मी शिलालेख कोरले असून त्यातून सातवाहन व पश्चिमी क्षत्रप (क्षहरात) यांच्या इतिहासाविषयी उपयुक्त माहिती मिळते. या लेणी-समूहात एक चैत्यगृह असून बाकीचे सर्व विहार आहेत. साधारणपणे येथील विहारांची ओसरी, मंडप व सभोवताली खोल्या अशी स्थापत्य-रचना आढळून येते. येथील स्तंभांचा घटकक्रम साधारणपणे अष्टकोनी स्तंभ, घंटाशीर्ष, आमलकयुक्त चौरसाकृती घटक, त्यावर स्वारशिल्प आणि कठडा असा आहे. साधारणपणे इ. स. पू. पहिल्या शतकापासून ते इ. स. सातव्या शतकापर्यंत येथे लेणी संबंधित कार्य सुरू होते. मूळच्या हीनयान लेण्यांत नंतर सुमारे सहाव्या शतकात महायान परंपरेसाठी आवश्यक असे बदल करण्यात आले. बऱ्याचशा लेण्यांत बौद्ध शिल्पे कोरण्यात आली आहेत. यातील गौतम बुद्ध यांची शिल्पे स्थानक, प्रलंबपादासन, पद्मासन, सिंहासन तसेच ध्यानमुद्रा, धर्मचक्रप्रवर्तनमुद्रा, वरदमुद्रा व महापरिनिर्वाणमुद्रेत कोरण्यात आली आहेत. सोबत बोधिसत्त्वांची (पद्मपाणी, वज्रपाणी, मैत्रेय इ.) शिल्पेही पाहावयास मिळतात.

## २. स्वरूप –

त्रिरश्मी लेणीसमूहात अनेक लेणी असून काही लेण्यांत स्त्रियांचे अलंकार आणि वस्त्रे अतिशय कलाकुसरीनी कोरलेली आहेत. या गुहांमध्ये संपूर्ण सुस्थितीतले एक प्रमुख चैत्यगृह आहे. त्याचे पूर्व दिशेचे प्रवेशद्वार चांगल्या स्थितीत आहे. पश्चिमेकडील काही लेण्यांचे बांधकाम अर्धवट राहिलेले आहे.






➢ **अधिक माहिती –**

पांडव लेणी प्रामुख्याने बौद्ध धर्माच्या हीनयान व महायान पंथांच्या कालखंडात खोदण्यात आली. येथे एकूण २७ ब्राह्मी शिलालेख कोरले असून त्यातून सातवाहन व पश्चिमी क्षत्रप (क्षहरात) यांच्या इतिहासाविषयी उपयुक्त माहिती मिळते. या लेणी-समूहात एक चैत्यगृह असून बाकीचे सर्व विहार

आहेत. साधारणपणे येथील विहारांची ओसरी, मंडप व सभोवताली खोल्या अशी स्थापत्य-रचना आढळून येते. येथील स्तंभांचा घटकक्रम साधारणपणे अष्टकोनी स्तंभ, घंटाशीर्ष, आमलकयुक्त चौरसाकृती घटक, त्यावर स्वारशिल्प आणि कठडा असा आहे. साधारणपणे इ. स. पू. पहिल्या शतकापासून ते इ. स. सातव्या शतकापर्यंत येथे लेणी संबंधित कार्य सुरू होते. मूळच्या हीनयान लेण्यांत नंतर सुमारे सहाव्या शतकात महायान परंपरेसाठी आवश्यक असे बदल करण्यात आले. बऱ्याचशा लेण्यांत बौद्ध शिल्पे कोरण्यात आली आहेत. यातील गौतम बुद्ध यांची शिल्पे स्थानक, प्रलंबपादासन, पद्मासन, सिंहासन तसेच ध्यानमुद्रा, धर्मचक्रप्रवर्तनमुद्रा, वरदमुद्रा व महापरिनिर्वाणमुद्रेत कोरण्यात आली आहेत. सोबत बोधिसत्त्वांची (पद्मपाणी, वज्रपाणी, मैत्रेय इ.) शिल्पेही पाहावयास मिळतात. येथे एकंदरीत २४ लेणी असून भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाने या उत्तराभिमुख लेणींना पूर्वेकडून पश्चिमेकडे अनुक्रमांक दिले आहेत.

लेणी समूहातील क्र. १ हे विशाल परंतु अर्धवट खोदलेले लेणे आहे. यास ओसरी व मंडप आहे. ओसरीत चार स्तंभ व दोन अर्धस्तंभ आहेत. या लेण्याच्या मुखभागावरील नक्षीकाम हे लेणे क्र. ३ सारखे आहे.

लेणे क्र. २ हे मूळतः वासिष्ठीपुत्र पुळुमावी याच्या राज्यरोहणाच्या सहाव्या वर्षी खोदले गेले असल्याचे येथील एका खंडित शिलालेखातून समजते. या लेण्यात गौतम बुद्ध व बोधिसत्त्वांची काही शिल्पे कोरली आहेत.



लेणे क्र. ३, पांडव लेणी, नाशिक.

लेणे क्र. ३ हा एक सुंदर विहार असून त्यात दोन खोल्या असलेली ओसरी व १८ खोल्या असणारा मंडप आहे. हे लेणे गौतमीपुत्र सातकर्णीची आई गौतमी बलश्री व मुलगा वासिष्ठीपुत्र पुळुमावी यांनी खोदवले. ओसरीत ब्राह्मी लिपीतील व प्राकृत भाषेतील चार शिलालेख असून सातवाहन व पश्चिमी क्षत्रपांच्या ऐतिहासिक साधनांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. ओसरीतील दरवाजाच्या दोन्ही बाजूंस दोन मनुष्याकृती व शिल्पपट आहेत. ओसरीत सहा अष्टकोनी स्तंभ आहेत. स्तंभशीर्षांवर मनुष्याकृती व काही प्राण्यांच्या मिश्रणातून बनलेली शिल्पे आहेत. ओसरीचा दर्शनी भाग सहा विशाल कीचक पेलत आहेत, असे दर्शविले आहे. मंडपात (१२.५ मी. x १४ मी. x ३.२ मी.) तिन्ही बाजूंना सलग छोटेखानी बाक कोरण्यात आलेला आहे. मंडपात समोरील भिंतीत तीन व चार क्रमांकाच्या खोल्यांच्या मध्ये एक अर्धउठावात पूजावस्तू असलेला स्तूप कोरण्यात आला आहे. त्याच्या दोन्ही बाजूंना भक्तजन स्तूपाची पूजा करीत असल्याची शिल्पे कोरण्यात आलेली आहेत. या व्यतिरिक्त या लेण्यात इतरही काही शिल्पपट कोरण्यात आलेले आहेत.

लेणे क्र. ४ हा एक लहान विहार असून यास दोन स्तंभ व दोन अर्धस्तंभयुक्त ओसरी आहे. स्तंभशीर्षांवर स्वार व हत्ती कोरलेले आहेत. लेण्यातील मंडप ६ मी. चौकोनाकृती असून २.७ मी. उंच आहे. मंडपाची जमीन खोल खोदून एक मोठे पोढे तयार करण्यात आले होते; परंतु आता ते बुजवून जमीन सपाट केली आहे.



लेणे क्र. ५ ते ९ साधारण असून उंचवट्यावर खोदली आहेत. लेणे क्र. ५ व ६ ही नंतरच्या काळात पोढीप्रमाणे उपयोगात आणल्याची दिसून येतात. लेणे क्र. ६ मध्ये एक शिलालेखही कोरण्यात आलेला आहे. लेणे क्र. ७ मध्ये एका भिक्षुणीचा दानलेख, तर लेणे क्र. ८ मध्ये बौद्ध उपासकांचे दोन दानलेख आहेत. लेणे क्र. ८ मधील एका लेखातील दानकर्ता 'मुगुदास' हा कोळी असून तो 'चेतिक' (चैत्यिक) पंथाचा उपासक असल्याचे समजते. लेणे क्र. ९ मध्ये एक ओसरी व तीन खोल्या असून स्तंभशीर्षांवर प्राण्यांची शिल्पे आहेत.

लेणे क्र. १० हा एक मोठा विहार असून लेणे क्र. ३ सारखा आहे. हा विहार जुन्नर येथील गणेश विहारानंतर सर्वांत मोठा विहार समजला जातो. या लेण्यात स्तंभ व दोन खोल्या असलेली ओसरी, तसेच तिन्ही बाजूंनी १६ खोल्या असलेला मंडप (१३.९ मी x १३.६ मी x ३ मी) आहे. मागच्या भिंतीत एक मोठा स्तूप होता. तो यादव काळात भैरवमूर्तीत रूपांतरित केल्याचे दिसून येते. या लेण्यात एकूण सहा शिलालेख असून त्यातील एक लेख आभीर राजाचा आहे. हे लेणे नहपानाचा जावई उषवदात (ऋषभदत्त) याने खोदवले असल्याचे याच लेण्यातील शिलालेखांवरून समजते. या लेण्यातील शिलालेख प्राचीन भारतीय इतिहासाच्या राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक आणि धार्मिक दृष्टीने खूप महत्त्वाचे आहेत. ओसरीतील स्तंभशीर्षांवर विविध प्राण्यांचे अंकन असून त्यात 'स्फिंक्स' देखील कोरले आहेत.

लेणे क्र. ११ मध्ये एक दानलेख असून मागील भिंतीवर नंतरच्या काळात ऋषभदेव, अंबिका व मातंग किंवा सर्वानुभूती ही जैनशिल्पे कोरण्यात आली आहेत. लेणे क्र. १२, १३ व १४ साधारण आहेत. लेणे क्र. १२ मध्ये भिक्षुसंघास लेणे दान दिल्याविषयी ६ ओळींचा एक लेख आहे.

लेणे क्र. १५ व १६ मध्ये सर्वसाधारणपणे लेणे क्र. २ प्रमाणेच गौतम बुद्ध व बोधिसत्त्वांची शिल्पे कोरण्यात आली आहेत. याशिवाय लेणे क्र. १६ हे लेणे क्र. १५ च्या वरती खोदले असून काही विद्वानांच्या मते मूळचे हीनयान पंथी असावे. या लेण्यात वज्रपाणी, बुद्ध व मैत्रेय यांची त्रिकूट शिल्पेही कोरण्यात आली आहेत.

लेणे क्र. १७ हे यवन व्यापारी 'इंद्राग्नीदत्त' याने खोदवले. या आशयाचा एक शिलालेख या लेण्याच्या ओसरीत कोरला आहे. हे लेणे चैत्यगृहाच्या

डाव्या बाजूला असून ओसरीत चार स्तंभ व दोन अर्धस्तंभ आहेत. ओसरीतील स्तंभशीर्षांवर

विभिन्न प्राण्यांची शिल्पे आहेत. यातील काही शिल्पे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. जसे एका प्राण्याला चोच असून त्याचे शरीर वाघाचे आहे. प्राण्यांवर स्वार झालेल्यांमध्ये काही व्यक्ती व मुले दर्शविण्यात आली आहेत.

चैत्यगृह, लेणे क्र. १८, पांडव लेणी, नाशिक.



लेणे क्र. १८ हे या टेकडीवरील एकमेव चैत्यगृह असून ते १२ मी. लांब व ६.५ मी. रुंद आहे. याचा तलविन्यास चापाकृती असून छत गजपृष्ठाकार आहे. लेण्यातील स्तूप १७ स्तंभांनी वेढलेला आहे. लेण्यातील दानलेख व वास्तुघटक पाहता सदर लेणे वेगेवेगळ्या टप्प्यांत पूर्ण झाले असावे, असे दिसते. या चैत्यगृहाचे मुख दगडी असल्याने लेणी विकासक्रमामध्ये ते दुसरी अवस्था सूचित करते. अजिंठा लेणे क्र. ९ व नाशिक येथे दगडी चैत्यगृहे खोदण्यास सुरुवात साधारणपणे एकाचवेळी व सर्वप्रथम झाल्याचे दिसून येते.

या लेण्यातील तीन शिलालेखांपैकी एकात सदर लेणे भटपालिकेने पूर्ण केल्याचे म्हटले आहे. या लेण्याच्या कमानीवर दोन्ही बाजूला नाग कोरले आहेत. चैत्यगवाक्षाच्या भोवती कोरलेली त्रिदलाची नक्षी (triskelion) ही मूळतः ग्रीक असून ती फक्त जुन्नर येथील गणेश लेणी-समूहाच्या पूर्वेकडील चैत्यगृह व नाशिक चैत्यगृहावर आढळून येते. लयन स्थापत्यविकासक्रमाचा विचार करता हे लेणे अजिंठा लेणे क्र. ९ व बेडसे चैत्यगृह यांमध्ये ठेवता येईल. त्यामुळे नाशिक चैत्यगृह इ. स. पू. पहिल्या शतकाच्या शेवटी व इ. स. पहिल्या शतकाच्या सुरुवातीला खोदले असावे, असे दिसते. चैत्यगृहाच्या दरवाजावरील कमानीवर घोडे, हत्ती, बैल, वाघ, श्रीवत्स व एक लेख इत्यादी कोरले आहेत. स्तंभशीर्षांवरतीही प्राणी कोरले आहेत.

गौतम बुद्ध आणि बोधिसत्त्व, लेणे क्र. २०, पांडव लेणी, नाशिक.

लेणे क्र. १९ हे लेणे क्र. १८ च्या बाजूला व लेणे क्र. २० च्या खाली आहे. हे लेणे कण्ह सातवाहनाच्या काळात खोदले असून आकाराने लहान आहे. यात सातवाहनकालीन प्राचीनतम शिलालेख आहे (इ. स. पू. सुमारे ३०-१२). या लेखात नासिकचा उल्लेखही आढळून येतो. लेणे क्र. २० मध्ये लेणे क्र. १८ समोरील जिन्याने जावे लागते. हे एक विशाल लेणे असून यात ओसरी व मंडप आहेत. मंडपाला आठ खोल्या आहेत. हे लेणे गौतमीपुत्र यज्ञश्री सातकर्णी याच्या सातव्या वर्षी भिक्षूंना उपयोगात आणण्यास दिले, असा येथील शिलालेखात उल्लेख आहे. मागच्या भागात (गर्भगृहात) विशाल बुद्धमूर्ती व बोधिसत्त्वांची शिल्पे आहेत. परंतु या लेण्यातले गर्भगृह आणि इतर मूर्ती या दुसऱ्या टप्प्यात कोरल्या असल्याच्या स्पष्ट खुणा या लेण्याच्या छतावर आणि बाजूच्या भिंतीत दिसून येतात.

लेणे क्र. २१ व २२ साधारण आहेत. लेणे क्र. २३ हे एक विशाल लेणे असून सहा ते सात लहान खोल्यांपासून बनले आहे.



या लहान खोल्या काही प्रमाणात तोडून एक भव्य आवार तयार केले आहे. या लेण्यात गौतम बुद्ध, अमिताभ बुद्ध, बोधिसत्त्व, नागराज इ. शिल्पे, खंडित स्तूप व दोन ब्राह्मी शिलालेख आहेत. लेणे क्र. २४ हे दोन खोल्या असलेले एक लहान लेणे आहे. या लेण्यात वाघ, बैल, दोन कुबडे असलेला उंट, मेंढी, डुकरे, हरीण, स्त्रीचे मुख असलेला घोडा, घुबड, उंदीर आणि लहान मुले इ. शिल्पे व दोन शिलालेख आहेत.


एकंदरीत, पांडव लेणीत सांस्कृतिक विकासाचे तीन टप्पे दिसून येतात. पहिला टप्पा इ. स. पू. सु. पहिले शतक ते इ. स. तिसरे शतक असा आहे. या टप्प्यात सुरुवातीला लेणे क्र. १९ व १८ (चैत्यगृह) खोदले गेले. या लेण्यातील स्तंभ हे अजिंठा येथील लेणे क्र. ९, कोंडाणे विहार लेणे क्र. २ यांच्याशी साधर्म्य स्थापित असल्याने समकालीन वाटतात. दुसरा टप्पा सु. पाचव्या-सहाव्या शतकानंतर सुरू होतो. या काळात गौतम बुद्ध व बोधिसत्त्वांची शिल्पे

मूळतः हीनयान पंथाशी निगडीत असणाऱ्या लेण्यांत कोरली गेली. या प्रक्रियेची सुरुवात संभवतः लेणे क्र. २ पासून झाल्याचे दिसून येते. सातव्या शतकानंतर हळूहळू ही लेणी जैन व हिंदू धर्मांच्या प्रभावाखाली आली असावीत, असे येथील काही शिल्पांवरून दिसून येते. इतिहास, मग तो एखाद्या देशाचा असो, संस्कृतीचा असो की एखाद्या ठिकाणाचा, त्याची कहाणी सांगणारे अनेक पुरावे आपल्याला त्याकाळात उभारल्या गेलेल्या विजय स्तंभातून, कोरल्या गेलेल्या शीलालेखातून समजत असतो. तसाच तो समजतो डोंगर, पर्वत आणि त्यांच्या अंगाखांद्यांवर कोरल्या गेलेल्या लेण्यांमधून! महाराष्ट्र हा मानवी संस्कृतीच्या प्रगतीचा साक्षीदार आहे. संपूर्ण देशात असणाऱ्या एकूण १२०० प्राचीन बौद्ध लेण्यांपैकी तब्बल ६८० लेणी महाराष्ट्रात आहेत. त्यात नाशिकमधल्या 'पांडव लेणी' किंवा 'त्रिरेशमी' मालिकेतील महत्वाच्या बौद्ध लेण्यांचा समावेश होतो.


रामायणकालीन भूमी म्हणून ओळख असलेल्या नाशिकचा हा इसवी सन पूर्व ठेवा, अजून कोणता इतिहास सांगतो? तब्बल अडीच हजार वर्षांपूर्वी, नाशिकच्या या भागाची गोवर्धन म्हणून ओळख होती, काय आहे यामागील इतिहास ? काय आहे नेमकी या लेण्यांची कहाणी ? सातवाहन साम्राज्य आणि या लेणी यांचा नेमका काय संबंध आहे ? असे अनेक प्रश्न पडणे स्वाभाविक आहे.

या लेखात आम्ही याच प्रश्नांचा शोध घेण्याचा आणि त्यामागे दडलेली कहाणी जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

गौतमीपुत्र सातकर्णी हा त्याकाळचा भारतातील सर्वात सामर्थ्यवान राजा! त्याच्या उदयाच्या वेळी सातवाहन साम्राज्य क्षीण झाले होते, जुन्नर, नाशिक इ. बहुतांश भाग क्षत्रपांनी गिळंकृत केला होता. गौतमीपुत्राने नहपान क्षत्रपाच्या विरोधात जोरदार आघाडी उघडून नाशिकजवळच्या सह्याद्री 2



खरं तर त्रिरेशमी (Trirashmi) नावानं यांची ओळख असल्याचं, आपला इतिहास सांगतो. या गुंफा पांडवलेणी नावानं परिचित असल्या तरी तब्बल ५०० वर्षपूर्व, बुद्धकालीन इतिहास जीवंत करणारा अमूल्य ठेवा मानला जातो.



ही पांडव लेणी पूर्वी 'त्रैराष्मी लेणी' म्हणून संबोधली जात असत. महत्वाचे म्हणजे जरी या लेण्यांना पांडवलेणी असे नाव आहे कारण या ठिकाणी काही काळ पांडव वास्तव्यास होते म्हणून त्यांना पांडवलेणी असे म्हणतात अशी दंतकथा ऐकिवात आहे. या लेण्यांना पुंड्रू असे संबोधले जायचे. ज्याचा पाली भाषेत अर्थ आहे "पिवळ्या रंगाचा रंग". कारण लेण्यांजवळ "चिवरा किंवा पिवळे वस्त्र" परिधान करणाऱ्या बौद्ध भिक्षूंचे निवासस्थान होते. पुढे, पुंड्रू हा शब्द बदलून पांडू गुहा झाला (प्राचीन स्मारक अधिनियम २६ मे १९०९ नुसार). अनेक दशकांनंतर लोकांनी त्याला पांडव गुहा असे संबोधण्यास सुरवात केली.

लेण्यांमध्ये कोरले गेलेले गौतमीपुत्र सातकर्णीची महती सांगणारे शिलालेख आहेत ज्यांचा महाराष्ट्रातील अत्यंत महत्वाच्या शिलालेखांमध्ये समावेश होतो.सातवाहन राजे ब्राह्मण असून वैदिक धर्माचे पुरस्कर्ते होते. गौतमीपुत्र सातकर्णी स्वत:ला येथील शिलालेखात 'ब्राह्मणनस' म्हणवतो.

लेण्यांमध्ये केलेल्या कोरीव कामावर बौद्ध संस्कृतीचा प्रभाव दिसत असला तरी प्राचीन काळाच्या ग्रीक, इराण संस्कृतीचे अवशेष देखील इथे ग्रीफीन, स्फिंक्स यासारख्या मूर्तींच्या असण्यामधून आपल्याला दिसतात. त्यांचा पांडवलेणीतील समावेश, प्राचीन काळात पाश्चिमात्यांबरोबर चालत असणाऱ्या व्यापाराचा पुरावा दाखवतो. व्यापाऱ्यांबरोबरच संस्कृतींमधला प्रवास, आदानप्रदानही इथे अधोरेखीत होते. बुद्धकालीन संस्कार, संस्कृती यांचा सुरेख मिलाप असणाऱ्या या लेणी जरी इसविसनपूर्व ५०० वर्षांपूर्वीच्या असल्या तरी काळाच्या ओघात, सातव्या शतकात या गडप झाल्या. तब्बल 11 शतकं या प्राचीन लेणी, या कातळाच्या पहाडात बंदिस्त झाल्या होत्या.

१८२३ साली ब्रिटिश सैन्यातील, गिर्यारोहणची आवड असलेल्या कॅप्टन जेम्स डेलमाईन याला या लेण्यांचा शोध लागला आणि या लेण्या पुन्हा प्रकाशात आल्या.

सम्राट अशोक काळातील मूळ प्राचीन लेणी आधारावर, या लेण्यांची रचना असल्याचं पुरातत्व खात्याचं म्हणणं आहे. बोधिसत्व पदमपाणी, बोधिसत्व वज्रपाणी यांच्या अप्रतिम मूर्ती, धम्मचक्र प्रवर्तन मुद्रेतील भगवान गौतम बुद्ध यांची मूर्ती, भिक्षुंची साधनागृह, तत्कालीन वीरांच्या मूर्ती, महिलांची आभूषणे, आपला गौरवशाली इतिहास जीवंत करतात. सातवाहन, क्षत्राप यासह काही काळ सत्ता असलेल्या अभिर या तिन्ही राजघराण्यातील एकच समान धागा म्हणून या त्रिरेशमी लेण्यातील, अनेक लेण्या आजही साक्षीदार आहेत.

बुध्दस्तुप, भिक्षूंची निवासस्थाने, बुध्दबोधिसविता, जैन तीर्थंकर ऋषभदेवजी, वीर मणिभद्रजी, माता अंबिकादेवी यांच्या दगडात कोरलेल्या एकसंध मूर्त्या या अग्रभागी असलेल्या लेण्यात आहे. याच पार्वताच्या माथ्यावर,या २५ लेण्यांच्या मालिकेतील ३ लेण्या, नव्याने येथील स्वच्छता कर्मचाऱ्यांना सापडल्या आहेत.मात्र तेथील वाट बिकट असल्याने अजून सहजपणे माथ्यावर जाता येत नाही. तरी लवकरच हा ही मार्ग खुला होईल अशी पर्यटकांना आणि इतिहासाच्या अभ्यासकांना आशा आहे.

आशा अनेक कहाण्या काळाच्या ओघात लपल्या गेल्या आहेत. त्या शोधून, इतिहासाचा हा पुरातन ठेवा जपण्यात, त्याचे संवर्धन करण्याचा प्रयत्न आपण सर्वांनीच करायला हवा. पांडवलेणी ही सुमारे तीस दगडात कोरलेल्या प्राचीन गुहा बघायला मिळतात मुख्यत जैन बौद्ध भिख्खूंच्या वास्तव्यासाठी इसवी सन 1980 या लेण्यांचे निर्माण करण्यात आले होते आणि स्वर्गीय

निवास्थान सारखे वाटते साधारण वीस मिनिटांचे ट्रेकिंग करून गेल्यानंतर नजरेस पडणारे सौंदर्य आहे असीम शांतता देऊन जाते जरी यारा ट्रेकिंग म्हटले आहे तरी येथे बांधव जिने असल्याने सोडून जाणे अगदी सोपे होते पांडवलेणी महाराष्ट्रातील नाशिक दक्षिणेस स्थित आहे या गुहांना विहार म्हटले जाते तुम्हा वाचकांना या सुंदर कलाकृती छोटीशी झलक म्हणून या गुहा इतक्या सुंदर आणि सुबक डिझाइन केलेल्या आहेत या काळाचे स्थापत्यशास्त्र सुद्धा किती विकसित होते याचा नमुना या लेण्यांच्या पाणीपुरवठा योजना बघू सहज येतो यामध्ये पाण्याच्या टाक्या सुद्धा कुशलतेने कोरलेल्या आहेत या गोड वाटणाऱ्या गोवा सुंदर कोरीव काम केलेले स्तूप बघून हे काम करताना कारागिरांच्या भावना सुद्धा नक्कीच सुंदर असते हजार वर्षापूर्वी कोरली गेलेली ही लेणी म्हणजे भारतातील प्राचीन स्थापत्यशास्त्र आणि संस्कृतीच्या इतिहासातील दागिनाचपांडवलेणी एकंदर चोवीस लेण्या 29 शिलालेख शिलालेख म्हणजे दगडावर अक्षरे कोरलेली आहेत ही ब्राह्मी लिपीतील आहेत त्याच चैत्य लयं आणि सत्र असे गुहांमध्ये तीन प्रकार दिसतात लेणी क्रमांक 14 मधील शिलालेखात दोन हजार वर्षापूर्वी नाशिकचे नाव नाशिक की असलेले नाशिक गंगापूर रोडवरील गोवर्धन हे गाव मुख्य बाजारपेठेचे ठिकाण होते हेही पांडवलेणी सांगते केंद्रीय पुरातत्त्व खात्याने प्रत्येक लेणी क्रमांक आला दिल्याने पर्यटकांना या लेणी क्रमांकानुसार पाहता येतात मात्र या क्रमाने लेणींची निर्मिती झालेली नाही ही लेणी पाहण्यासाठी दिसते असे का म्हटले गेले याचे श्रेयही नाशिक पांडवलेणी लाभले आहे हा शब्द प्रथम आलेला दिसतो येतच लेन महादेवी महाराज माता महाराज आता मही ददाति लेन हा शब्द संस्कृत लयं म्हणजे गृह या शब्दावरून आलेला आहे त्यापासून पुढे लेणी हा शब्द तयार झाला पांडवलेणी यांचे स्वरूप भिख्खूंना राहण्यासाठी बिहार असे होते म्हणजेच बौद्ध भिक्षूंना राहण्यासाठी या वेळी या


लेणींची निर्मिती झालेली हेही समजते पांडवलेणी यातील शिलालेखांवरून महत्त्वाची आणि ऐतिहासिक माहिती समजते यातून त्यावेळची प्रांतांची नावे पर्वत नद्या शहरे गावे व खेडी अशा इतिहासातील शिलालेखात अथवा कृष्ण उशीर अथवा हकू श्री नहपान हा गौतमीपुत्र सातकर्णी भारतात खंडात कोरलेला सुमारे बाराशे लेण्या आहेत यातील जाराहून अधिक लेणी महाराष्ट्रात आढळतात बेसाल्ट प्रकारच्या दगड महाराष्ट्राच्या डोंगरांमध्ये सर्वाधिक असल्याने येथे जास्त लेणी खोदण्याच्या दिसते नाशिकच्या पांडवलेणी ही प्रसिद्ध आहे नाशिक पासून सहा किलोमीटर अंतरावर एका मोठ्या टेकडीवर ह्या लेण्या आहेत पांडवलेण्याच्या सर्व साधारण इसवी सन पूर्व पहिल्या शतकात आठवे शतक असा मानला जातो आत्तापर्यंत नाशिक नाशिक महामार्ग लागून मोठ्या दृश्य दिसते.


## निष्कर्ष –


पांडवलेणी हा ऐतिहासिक वारसा स्थळ प्रकल्प करताना असेच दिसून येते की येथील कोरीवकाम नक्षीकाम येथील ऐतिहासिक दृष्ट्या प्रचंड बघण्यासारख्या व अभ्यास करण्यासारखे आहे येथील ऐतिहासिक वारसा येथील परंपरा सांस्कृतिक शिल्पकला वस्तुकला मूर्तिकला या येथील कारागिरांनी स्वत: किती भावनेने व प्रचंड कलेने तयार केलेले आहेत हे दिसून येते येथील आत्ताच्या काळातील देखरेख ही व्यवस्थित रित्या जपत आहेत दिसून येते येथील साफसफाई येण्याची पर्यटन हे सर्व काही अतिशय चांगल्या प्रकारात दिसून येतो पांडवलेणी एक वारसा स्थळ नाशिकच्या अतिशय जवळ असल्याने व येथील कोरीव काम बघण्यासाठी येणारे लोक ही भरपूर आहेत पांडवलेणी लेणी या शब्दाचा उगम हे येथून झालेला असेही इथं दिसून आले येथे आताच्या काळी अजून तीन लेण्या सापडल्या तेही बघण्यास मिळाल्या येथील बुद्धांची मूर्ती अजूनही जैसे थे तशीच आहे हजारो वर्षापूर्वी येथील कारागीर कशाप्रकारे कोरीव काम करीत आहेत हेही दिसून आले परंतु येथील लेण्यांना दिलेले क्रमांक हे त्या लेण्यांचे बांधण्यावर व कोरीव काम करण्यावर नाहीत तर प्रत्येक लेणी चा इतिहास व प्रत्येक लेणी चा काळ हा वेगळा आहे असे दिसून येते प्रत्येक लेणी क्रमांक हा आत्ता ठरवला गेलेला आहे हे दिसून आले येथील निसर्ग वातावरण प्रचंड व्यवस्थित आहे झाडांची संख्या ही जास्त आहे व वातावरणही थंड आहे येथील प्रत्येक लेणी वर काहीतरी लिहिलेले आढळते व यावरून त्या लेणीचा इतिहास ही समजला जातो हे दिसून आले. पांडवलेणी येथिल निष्कर्ष आपण असाही काढू शकतो की तेथील लाईटची व्यवस्था ही सरकारने केली पाहिजे तेथील वर जाण्यासाठी पायऱ्यांची व्यवस्थाही केली पाहिजे त्यानंतर येथील स्वच्छता ही नागरिकांनी ठेवली


पाहिजे पर्यटकांनी तेथे गेल्यावर तेथील किंवा कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करू नये किंवा काही लिहू नये स्थापत्यकला मूर्तिकला शिल्पकला चित्रकला यास कोणतीही हानी होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे सरकारने एक वेळेनुसार तेथे बंधन घातले पाहिजे व तेथे सर्वसाधारण वयस्कर व सर्वांना तेथे जाण्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत तेथील स्वच्छता ही आहेत परंतु पर्यटकांना ही स्वच्छता व तेथील वस्तू कलेची व शिल्पकला काळजी घेण्यास सांगितले पाहिजे अवाहन केले पाहिजे पांडवलेणी अशा ऐतिहासिक स्थळ निगा राखली गेली पाहिजे ऐतिहासिक स्थळांची निगा राखणे ही आपली जबाबदारी आहे हे पर्यटकांना सांगितले पाहिजे


## ➤ प्रत्यक्ष भेटचे छायाचित्र



## ➢ संदर्भ


- विकिपीडिया
- प्रत्यक्ष भेट
- व सरांचे मार्गदर्शन
- विकिपीडिया
- http://www.ajanta-ellora.com/pandavleni-caves.html
- भारतातील जागतिक वारसा स्मारके आणि संबंधित वास्तू, खंड 1 'अली जाविद, तबस्सुम जावेद, अल्गोरा प्रकाशन, 2008
- दक्षिण भारत: जॉर्ज मिशेल, रोली बुक्स प्रायव्हेट लिमिटेड, 1 मे 2013 द्वारे स्मारक साइट्स आणि संग्रहालयांसाठी मार्गदर्शक